स्वच्छप्रत

**दिनांक - 01/07/2019 रोजी मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा व टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करणेत आली होती त्या सभेचे इतिवृत्त.**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलिस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | नगररचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 6. | विभागीय वन अधिकारी, चिपळूण | सदस्य |
| 7. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्राण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 8. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 9. | प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी एमआयडीसी रत्नागिरी | सदस्य |
| 10. | तहसीलदार रत्नागिरी | सदस्य |
| 11. | मुख्याधिकारी नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 12. | मुख्याधिकारी नगर परिषद चिपळूण | सदस्य |
| 13. | मुख्याधिकारी नगर परिषद राजापूर | सदस्य |

---

मा.सदस्य सचिव महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

मा.सदस्य सचिव यांनी माहे मार्च 2016 पासून बैठक झालेली नसून माहे जून 2019 पासून दर महाच्या लोकशाही दिनानंतर जिलहास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग कमिटीची बैठक होणार असल्याची सूचना देण्यात आली.

सदर सूचनेच्या अनुषंगाने सागरी किनारा असलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये जिलहास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती स्थापन करण्याबाबत पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक. एमसीझेडएमए 2011/सीआर-6/एमसीझेडएमए दिनांक 23 मार्च, 2011 ने कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती गठीत करण्यात आली आहे.

मा.सदस्य सचिव यांनी सदर जिल्हा स्तरीय समितीला प्रदान केलेल्या शक्ती नुसार कोणकोणते कामकाज करावयाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यामध्ये सीआरझेड 1, 2, 3 बाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

1) अनधिकृत बांधकामे होऊ न देणे तसेच

2) सागरी पर्यावरणाच्या बाबत सुरक्षा व चांगल्या त-हेच्या धारणांचा बाबतीत तसेच प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

3) नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करणे.

सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढणेची आहेत.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देवून व सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्रमांक.महसूल/कार्या-13/कोस्ट झोन/2019
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - 03/08/2019.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे सहीची आहे.

**(दत्ता भडकवाड)**
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**
**तथा सदस्य सचिव**
**जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती**

स्वच्छप्रत

**दिनांक - 01/07/2019 रोजी मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करणेत आली होती त्या सभेचे इतिवृत्त.**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलिस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | नगररचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 5. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी (प्रतिनीधी) | सदस्य |
| 6. | उपविभागीय अधिकारी चिपळूण (प्रतिनिधी) | सदस्य |
| 7. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्राण मंडळ रत्नागिरी | सदस्य |

---

मा.सदस्य सचिव महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5 प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सीआरझेड नोटीफिकेशन 1991 च्या तरतुदींचे उल्लंघन करणा-या बाबींचे सर्वेक्षण करुन तरतुदींचा भंग झाला असल्यास त्यावर कार्यवाही करणेची आहे.

1. विनापरवाना बांधकाम प्रकरणे शोधणे.
2. पर्यावरण खात्याची परवानगी न घेतलेली परंतु इतर खात्याची परवानगी घेऊन पूर्ण झालेली अगर अपूर्ण बांधकामे शोधणे.
3. पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली परंतु अटी व शर्तीचा भंग झालेली प्रकरणे शोधणे.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

**(दत्ता भडकवाड)**
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**
**तथा सदस्य सचिव, टास्कफोर्स समिती**

क्रमांक.महसूल/कार्या-13/टास्कफोर्स/2019
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - 03/08/2019.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे सहीची आहे.

**दिनांक - 05/08/2019 रोजी मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा आयोजित करणेत आली होती त्या सभेचे इतिवृत्त.**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलिस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | नगररचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 5. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्राण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 6. | उपविभागीय अधिकारी चिपळूण (प्रतिनिधी) | सदस्य |

---

मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

मा.सदस्य सचिव यांनी माहे मार्च 2016 पासून बैठक झालेली नसून माहे जून 2019 पासून दर महाच्या लोकशाही दिनानंतर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग कमिटीची बैठक होणार असल्याबाबत यापुर्वीच्या सभेत सूचना देणेत आलेल्या आहेत.

सदर सूचनेच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना या कार्यालयाकडील प्रलंबित प्रकरणांची यादी देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रलंबित प्रकरणांबाबत केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल सादर करणेच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. तसेच सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढून त्यांची माहिती सभेमध्ये घेवून येणेच्या सूचना देणेत आलेल्या होत्या. मात्र आज रोजीचे बैठकीत जिल्हयातील अतिवृष्टीचे कारणामुळे सर्व सदस्य सभेस उपस्थित नाहीत. तरी पुढील महाचे सभेमध्ये सर्व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडील प्रलंबित प्रकरणांचे पुर्तता अहवालासह तसेच नवीन आढळून आलेल्या प्रकरणांची तपशीलासह व केलेल्या कार्यवाही बाबतचे माहितीसहीत उपस्थित रहावे, अशा सूचना देण्यात आल्या.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस उपस्थित रहाणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देवून व सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्रमांक.महसूल/कार्या-13/कोस्ट झोन/2019
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - 06/08/2019.

**(सुनील चव्हाण)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी**

**दिनांक - 05/08/2019 रोजी मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करणेत आली होती त्या सभेचे इतिवृत्त.**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलिस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | नगररचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 5. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी (प्रतिनीधी) | सदस्य |

---

मा.सदस्य सचिव महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5 प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सीआरझेड नोटीफिकेशन 1991 च्या तरतुदींचे उल्लंघन करणा-या बाबींचे सर्वेक्षण करुन तरतुदींचा भंग झाला असल्यास त्यावर कार्यवाही विनापरवाना बांधकाम, पर्यावरण खात्याची परवानगी न घेतलेली परंतु इतर खात्याची परवानगी घेऊन पूर्ण झालेली अगर अपूर्ण बांधकामे शोधणे, पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली परंतु अटी व शर्तीचा भंग झालेली प्रकरणे शोधणे अशा सूचना देण्यात आल्या.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

क्रमांक.महसूल/कार्या-13/टास्कफोर्स/2019
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - 06/08/2019.

**(सुनील चव्हाण)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी**